# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 411 018.

## करआकारणी व करसंकलन विभाग

| | |
|---|---|
| परिपत्रक स्वरुप | माजी सैनिक व सैनिक विधवा/पत्नी यांना मालमत्ता करातून सूट देणेबाबत.. |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/९/काvि/ ४२ /२०२१, दिनांक - २३/ ०२ /२०२१ |
| विषय | माजी सैनिक व सैनिक विधवा/पत्नी यांना मालमत्ता करातून सूट देणेबाबत.. |
| कोणाच्या माहितीसाठी | प्रशासन अधिकारी / सहा.मंडलाधिकारी / गट प्रमुख / रोखपाल / उपलेखापाल |
| संदर्भ | 1. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.५९/नवि-२०,दिनांक ०५ एप्रिल२०१६<br>2. शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.५९/नवि-२०,दिनांक०७एप्रिल२०१६<br>3. परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/५/कावि/२०६/२०१६,दिनांक ०९/०६/२०१६<br>4. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.५९/नवि-२०,दिनांक९ जानेवारी२०१७<br>5. परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/५/कावि/७२/२०१७,दिनांक०३/०४/२०१७<br>6. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.५९/नवि-२०,दिनांक ९ सप्टेंबर२०२०<br>7. परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/९/कावि/ २१६ /२०२०, दिनांक २१/०९/२०२०<br>8. सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१०१/ भाग-२/का.२८,दिनांक २३/११/२०२० |

परिपत्रक,

महाराष्ट्र राज्यात वास्तव्य करणाऱ्या संरक्षण दलाच्या सेवेतील माजी सैनिकांनी देशासाठी प्राणाची बाजी लावून देशाचे संरक्षणाचे केलेले कार्य विचारात घेऊन नगर विकास विभागाने संदर्भांकित क्रमांक ६ च्या दिनांक ०९/०९/२०२० च्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील नागरी स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या सर्व माजी सैनिकांना मालमत्ता करातून सूट देण्याचा निर्णय घेतला होता.

नव्याने प्राप्त संदर्भांकित क्रमांक ८ च्या दिनांक २३/११/२०२०रोजीच्या शासन निर्णयाद्वारे संदर्भांकित क्रमांक ६ चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात असून सुधारित " मा बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजना"अंतर्गत माजी सैनिक व सैनिक विधवा/पत्नी यांना मालमत्ता करातून सूट देण्याचा शासन निर्णय निर्गत केलेला आहे. त्या अनुषंगाने अशा कर माफीस पात्र ठरणा-या मिळकतींना मालमत्ता करातून सूट देणेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

1. " मा बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजना" (माजी सैनिक व सैनिक विधवा/पत्नी यांना मालमत्ता करातून सूट)नुसार माजी सैनिक व सैनिक विधवा/पत्नी यांचे नावावर असणाऱ्या मिळकतीच्या मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभ कर, पाणी पुरवठा लाभ कर, रस्ता कर) सूट लागू राहील.
2. महाराष्ट्र शासनाचे शिक्षणकर, रोजगार हमी व फ्लोअरेज कर तसेच अन्य वृक्ष कर, विशेष साफसफाई कर, अवैध बांधकाम शास्ती कर इत्यादीमध्ये सूट लागू राहणार नाही.
3. मिळकतधारकांनी सदर करमाफीचा लाभ घेण्यासाठी सूटीची रक्कम वगळता थकबाकीसह संपूर्ण मिळकतकर रक्कम भरणे अनिवार्य राहिल.
4. या योजनेचे लाभ मिळण्यासाठी सदर माजी सैनिक महाराष्ट्र राज्यात जन्मलेला असावा किंवा महाराष्ट्र राज्याचा किमान १५ वर्ष सलग रहिवासी असावा.त्याकरिता त्याने सक्षम प्राधिकारी यांचेकडून अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
5. अशा कर माफीस पात्र ठरणाऱ्या व्यक्तीने संबधित जिल्ह्याच्या जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचेकडून प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

कृपया मागे पहा.....

6. अशी पात्र व्यक्ती राज्यातील एकाच मालमत्तेकरिता करमाफीस पात्र राहील.तसे घोषणापत्र त्यांनी संबधित जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक राहील.
7. या योजनेचे लाभ संबधित माजी सैनिक व त्यांच्या पत्नी/विधवा हयात असेपर्यंत देय राहील.तसेच अविवाहित शहीद सैनिकांच्या बाबतीत त्यांचे आई वडील हयात असेपर्यंत हे लाभ देय राहतील.
8. माजी सैनिकांच्या मिळकतींचे सवलत मिळणेबाबत अर्ज प्राप्त झालेनंतर मालमत्ता करात सूट देणेबाबतचे अधिकार संबधित करसंकलन विभागीय कार्यालयांचे प्रशासन अधिकारी यांना अधिकार राहतील.

प्रस्तुत परिपत्रकानुसार सर्व संबधितानी कार्यवाही करावी.

24/02/21

आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रति, 1) प्रशासन अधिकारी / सहा.मंडलाधिकारी, सर्व विभागीय कार्यालय

प्रत : 1) मुख्य लेखापरिक्षण विभाग 2) सर्व क्षेत्रीय कार्यालय
3) माहिती तंत्रज्ञान विभाग / मे. टेक 9 सर्व्हिसेस - संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करणेकामी